महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : चौथी

-----------------------------------------------------------------------------------------------------

# लेखन : स्व-अभिव्यक्ती

**अनुभव लेखन**

१) तुझ्या हाताचं निरीक्षण करून तुझ्या हाताच्या सर्व बोटांचे उपयोग तुला लिहिता येतात का ते पहा व लिही.
उदा. अंगठा: कोणतीही वस्तू आरामात व सहज पकडता येण्यासाठी त्याचा उपयोग होतो.
२) इंद्रधनुष्याला पाहून तुला कोणकोणते प्रश्न पडतात? त्यांची यादी कर.
३) तुझ्या गुरुजी/बाई यांच्यातील कोणते गुण तुला आवडतात? अशा गुणांची यादी कर.
४) खरं बोलण्याच्या फायदे आणि तोट्यांची यादी कर.[प्रत्येकी दोन मुद्दे अपेक्षित]
५) तुझ्यामते कामचुकारपणा म्हणजे काय ?तू कधी असा चुकारपणा केला आहेस का? तेव्हा काय झाले?
६) पाऊस पडून गेल्यावर सगळीकडे चिखल होतो . चालताना काय काय मजा येते ?तुझी अशी चिखलात चालण्याची गंमत लिही .
७) तुला वर्गप्रमुख बनवण्यात आलाय असं समजतुझ्यासकट वर्गातील सर्व मुलामुलींनी पाळायला हवेत असे काही नियम तयार कर.
८) तुला कधी कधी शाळा बुडवावीशी वाटते का?का ते लिही जर बुडवावी वाटत नसेल तर त्याचे कारण लिही.
९) "तुझ्या मित्र मैत्रिणीसोबत तू एखादा नवीन खेळ खेळतेस/खेळतोस का त्या खेळाविषयी खालील मुद्द्याचा वापर करून मांडणी कर .
खेळाचे नाव-
खेळाडू किती-
खेळाचे नियम

१०) मोठी माणसं तुझ्याशी कशी वागलेली तुला अजिबात आवडत नाहीत?अशा पाच गोष्टी लिही.
११) ज्यातून आनंद मिळतो अशा पाच गोष्टींची यादी कर
१२) खूप कंटाळा येतो अशा पाच गोष्टींची यादी कर

---

१३) चिंगी पावसात भिजताना थेंब झेलत होती पण पावसाचे पाणी तिला झेलता येत नव्हतं.का घडत असेल असं तुला वाटतं?
१४) सहलीसाठी पैसे द्यायला वडील तयार नाहीत ;तर तू काय करशील ?
१५) विज्ञानाची वही घरी विसरली आणि बाई खूप लिहुन देत आहेत ;तर तू काय करशील?

**काल्पनिक लेखन**

१) 'मुंगी' स्वत:विषयी माहिती सांगत आहे अशी कल्पना करून चार ते पाच ओळी लिही.
२) घोड्याला पंख आले अशी कल्पना करून एक छोटी काल्पनिक गोष्ट तयार कर.
३) तुला जर सूर्य भेटला तर तू सूर्याला कोणते प्रश्न विचारशील? तीन ते चार प्रश्नांची यादी बनव.
४) तुझी काही चूक नसताना तुला कोणी मारलं तर तुला काय वाटेल?तू काय करशील?
५) भाकरी करताना काय काय करावे लागते? क्रमाने पाच वाक्ये लिही.
६) संतोष पहिल्यांदाच शहरात गेला तेव्हा... हा संदर्भ घेऊन आठ ते दहा वाक्यांत गोष्ट लिही.
७) सतुदादाचा बैल आजारी पडला. सतू दादा आता काय करेल? याची कल्पना करून पाच ते सात वाक्ये लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : चौथी

---

**विनोद**

मुलगा - आजी आज शाळेत धावण्याची स्पर्धा आहे!
आजी - असं का! नीट सावकाश धाव रे बाळा!
हे वाचून आपल्याला का हसू येते?

**जाहिरात**

बालसाहित्याचे प्रदर्शन!
5000 हून अधिक पुस्तके
कविता, गोष्टी, रंगीत चित्रे.
दोन पुस्तके विकत घेणाऱ्यास अधिक सवलत.
स्थळ : सुमंगल कार्यालय, पोलीस चौकीजवळ
दिनांक : 5 मे ते 15 मे 2016

ही जाहिरात वाचून तू आईबाबांशी काय बोलशील?

**पत्रलेखन**

तुझ्या शिक्षकांचा वाढदिवस आहे. त्यांना शुभेच्छा देणारं पाच ते सात ओळींचे पत्र तयार कर.

---

**मुलाखत**

एका सैनिकाची मुलाखत घ्यायची आहे. त्यांना विचारण्याच्या प्रश्नांची यादी कर. पाच ते सहा प्रश्न तयार कर.

**विषयाशी जोडलेले शब्द**

१) खाली दिलेल्या विषयाशी संबधित पाच शब्द लिही
उदा.पाऊस -वारा,वीज,ढग,चिखल
दिवाळी
शाळा
दप्तर
आई
मित्र

२) एकेका शब्दाने वाक्य वाढवून लिही.अशी तीन वाक्ये बनव.
उदा.घरी जा ---लवकर घरी जा -तू लवकर घरी जा.
मला दे

३) एकेका शब्दाने वाक्य वाढवून लिही.अशी तीन वाक्ये बनव.
उदा.घरी जा ---लवकर घरी जा -तू लवकर घरी जा.
हे घे

४) ‘म’हे मुळाक्षर घ्या आणि ज्यात ‘म’आहे असे नाव,गाव ,वस्तू,फळ,यांची नावे लिही.

**वैचारिक लेखन**

मुलांना आणि मुलींना वेगळे वागवतात. याबद्दल तुझे मत लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**शब्दांवरून गोष्ट**

रेडकू. म्हैस, हरवणं , शोध.....या शब्दांचा वापर करून एक छानशी गोष्ट तयार कर.

"खालील शब्दावरून गोष्ट तयार कर.

१) थंडी,शेकोटी, ऊब,पहाट.

२) कोंबडी,पिली,डालगे.

३) भाऊ,बहिण , फुलपाखरू.

**संवाद लेखन**

१) खडू आणि फळा या दोन वस्तू एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिही.

२) दार आणि खिडकी यांच्यातील भांडणाची कल्पना करून ते तुझ्या शब्दात लिही.